अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २२ सप्टेंबर २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ३५३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

दोन ठिकाणी विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : शहरातील जेलरोड आणि एमआयडीसी परिसरात दोयांनी अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची नोंद शासकीय रुग्णालयात दाखल झाली आहे.

साईबाबा चौक परिसरात राहणाऱ्या बालाजी सिद्राम तुम्मा (वय ५०) याने शुक्रवारी दारूच्या नशेत विषारी रंग प्राशन केले होते. त्याला आकाश (मुलगा) यांनी रुग्णालयात दाखल केल्याची नोंद जेलरोड पोलीसात झाली. तर दुसरी घटना नरसिंग विडीघरकुल परिसरात शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. शांता बालाजी गडगी (वय २९) असे महिलेचे नाव आहे.

परिचारक-भालकेंचा एका हारात सत्कार; मैदानात एकत्र येत करणार का चमत्कार?

पंढरपूर-मंगळवेढा/प्रतिनिधी

राज्यात विधानसभेचे वारे जोरात वाहू लागले आहे. प्रत्येक मतदारसंघात अनेक इच्छुक निर्माण झाले आहेत. अशातच पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून इच्छुक प्रशांत परिचारक व भारत भालके हे मंगळवेढ्यातील संत दामाजी साखर कारखान्याच्या कार्यक्रमात शनिवारी एकत्र आले. आयोजकांनी दोघांचा एकच हार घालून सत्कार केला. एकाच हारात सत्कार स्वीकारणारे परिचारक-भालके आगामी विधानसभा निवडणुकीत दामाजी कारखान्याच्या निवडणुकीप्रमाणे एकत्र येत चत्मकार करणार का याकडे सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

मंगळवेढा : येथे शनिवारी झालेल्या कार्यक्रमात प्रशांत परिचारक व भगीरथ भालके यांचा एकाच हारात सत्कार करण्यात आला.

एनसीडीसीकडून मंगळवेढा तालुक्यातील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याला ९४ कोटींचे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी आमदार प्रशांत परिचारक यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला भगिरथ भालकेही उपस्थित होते. रतनचंद शहा अर्बन बँकेचे अध्यक्ष राहुल शहा हे उपस्थित नव्हते. सध्या मंगळवेढा-पंढरपूर मतदारसंघातून प्रशांत परिचारक यांच्यासह भगिरथ भालकेही इच्छुक आहेत. हे दोघे कोणत्या पक्षाकडून लढणार याबाबत दोनही तालुक्यांमध्ये उत्सुकता आहे.

भगिरथ भालके महाआघाडीकडून इच्छुक असून त्यांनी दोन वेळा पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतलेली आहे. त्यांनी मतदारसंघात जन आशीर्वाद यात्रा सुरू केली आहे. याच मतदारसंघातून माजी आमदार प्रशांत परिचारकदेखील आमदारकी लढण्यासाठी इच्छुक आहेत. परिचारक हे जिल्हा परिषद गटनिहाय दौरे करत आहेत. त्या दौऱ्यात ते पोटनिवडणुकीत केलेल्या मदतीबाबत पश्चाताप व्यक्त करत कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असे सांगत आहेत. हे एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असणारे भालके-परिचारक शनिवारी मंगळवेढ्यात एकाच व्यासपीठावर आले होते. भालके आणि परिचारक यांचा एकच हार घालून यावेळी सत्कार करण्यात आला. मात्र, विधानसभेला कोणता हार या दोघांना एकत्र आणेल, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दामाजीप्रमाणे समविचार आघाडी होणार का?

दोन वर्षांपूर्वी भालके आणि परिचारक यांनी संत दामाजी साखर कारखान्याच्या निवडणुकीत समविचारी आघाडीची स्थापना केली होती. त्यावेळी भाजपचे आमदार समाधान आवताडे यांच्या विरोधात समविचारी आघाडीचे उमेदवार उभे करून दामाजीची निवडणूक जिंकली होती. येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत पंढरपूर मंगळवेढा विधानसभेमधून परिचारक-अवताडे यांनी समविचारी आघाडी उभी करून निवडणूक लढली तर फारसे आश्चर्य वाटायचे कारण नाही.

सरकारवर टीका केल्यास परिचारकांना अडचणी : भालके

कार्यक्रमाला आलो नसतो तर काहींनी वेगळा अर्थ काढला असता, म्हणून जन आशीर्वाद यात्रा सोडून मी कार्यक्रमाला आलो, असे भगीरथ भालके यांनी सांगितले. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर टीका करणे टाळले. 'मी सरकारवर टीका केली तर प्रशांत परिचारकांना अडचणी होतील, अशी मिष्किल टिप्पणीही त्यांनी केली.या कारखान्याला मदत मिळू नये म्हणून काही प्रयत्न केल्याचा गौप्यस्फोटही त्यांनी केला.

मंगळवेढा : भगीरथ भालके आणि प्रशांत परिचारक यांच्यातील एकजुटीची टिपलेली ही भावमुद्रा.

एका मेसेजवर ९४ कोटी उपलब्ध झाले : परिचारक

माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सरकारला उत्तर देताना म्हणाले, एका मेसेजवर ९४ कोटी उपलब्ध झाले आहेत, त्यामुळे सरकारबद्दलही आगामी काळात कृतज्ञता व्यक्त करायला हवी.

हा तर शुभसंकेत...

सोलापूरसह जिल्ह्यात पावसाळी वातावरण आहे. अधूनमधून पाऊसही पडत आहे. कार्यक्रमात भालके हे बोलत असताना अचानक पाऊस सुरू झाला.अशा प्रसंगी भालकेंनी समयसूचकता दाखवत साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.हा पाऊस म्हणजे आपल्यासाठी एक शुभसंकेत आहे,असे म्हणताच उपस्थितांमधून टाळ्यांचा कडकडाट झाला.भालकेंच्या या विधानाकडे राजकीयदृष्ट्या पाहिले जात आहे.वरूणराजाचा हा शुभसंकेत म्हणजे परिचारक-भालके यांची मने जुळायला लागतील,अशी चर्चा कार्यक्रमानंतर जाणकारांमध्ये झाली.

विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी दोघांविरूध्द गुन्हा

सोलापूर : होमलोनचे पैसे ताबडतोब भरा नाही तर घर खाली करा असे म्हणून विवाहितेसमोर अश्लिल चाळे करून व तिचा विनयभंग केल्याप्रकरणी फाईव्हा स्टार फायनान्सचे विशाल जाधव व गणेश वेदपाठक (दोघे रा. सोलापूर) या दोयांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी त्या विवाहितेने एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. १० सप्टेंबर रोजी ती विवाहिता व तिची सासू या दोघी घरी होत्या. तिचे पती बाहेर गेले होते. दुपारी ती विवाहिता व तिचा मुलगा हे दोघे घरी असताना फाईव्ह स्टार फायनान्सचे विशाल जाधव व गणेश वेदपाठक हे दोघे त्या विवाहितेच्या घरी आले व होमलोन संदर्भात विचारणा करत अश्लिल भाषेत शिवीगाळ केली.

विशाल जाधव याने अश्लिल हावभाव करून विनयभंग केला. या फिर्यादी वरून फाईव्ह स्टार फायनान्सचे विशाल जाधव व गणेश वेदपाठक या दोयांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास हवालदार पवार हे करित आहेत.

जरांगे-पाटलांनी ठणकावले, दादागिरी करायची नाही लक्ष्मण हाकेंनी सुनावले, आम्ही बांगड्या भरल्या नाहीत

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राज्यात मराठा-ओबीसी वाद चांगलाच उफाळला असून जालन्यात गुरूवारी मध्यरात्री वडीगोद्री येथे ओबीसी आंदोलकांनी रस्ता रोको केले. याच रस्त्याने मराठा आंदोलक अंतरवाली सराटीकडे जात असल्याने ओबीसी आणि मराठा आंदोलक आमने-सामने येवून जोरदार घोषणाबाजी केल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.स्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळीच पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला मात्र या प्रकारावरून मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील तसेच ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी

एकमेकांना इशारा-प्रतिइशारा दिल्यामुळे राज्यात तणाव वाढत चालला आहे.

जरांगे यांचे सहा आंदोलन झाल्यावर आम्ही एक दोन आंदोलने करु नये का? असा सवाल करत आमच्या मंडपासमोर रॅलीने येऊन घोषणाबाजी होत असेल तर आम्ही काय बांगड्या भरल्या नाहीत. आम्ही जशास तसे उत्तर देऊ असा इशारा ओबीसी आरक्षण नेते लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. आम्ही वर्षभर झुंडशाही बघतोय. कायदा सुव्यवस्थेचा मक्ता केवळ आम्हाला दिलाय आणि याने वाटेल ते बोलावे, वाटेल त्या शिव्या द्याव्यात. ? असा सवाल हाके यांनी जरांगेंना केला.

दादागिरी करायची नाही : जरांगे

या प्रकरणावरून मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील हे जाम भडकले आहेत.ओबीसी नेत्यांनी केलेल्या भडकावू वक्तव्यांचा त्यांनी समाचार घेतला. रस्ता अडवून चालणार नाही. आम्ही वडी गावची आम्ही इज्जत करतो, दादागिरी करायची नाही,असा प्रतिइशारा त्यांनी दिला. अंतरवालीमध्ये येणाऱ्या मराठा समाजातील नागरिकांनी ज्या रस्त्याने आले, त्याच रस्त्याने जायचे. काही अनुचित प्रकार घडला असता आणि दंगल झाली असती तर तर याला फडवणीस आणि भुजबळ जवाबदार राहतील. भुजबळांचे ऐकू नका मराठ्यांनी शांततेत यावे,असे आवाहन जरांगे यांनी समाज बांधवांना केल

जड वाहतुकीचा बळी

टिप्परच्या धडकेने तरुण ठार

सोलापूर : वेगाने जाणाऱ्या टिप्परच्या धडकेने दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शुक्रवारी दुपारच्या सुमारास अक्कलकोट ते सोलापूर मार्गावरील कुंभारी गावाजवळ घडला.

बरगली शिवानंद बन्ने (वय २८ रा. कुंभारी ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. तो दुचाकी वरून शेतातून कुंभारी गावात सर्विस रोडने जात होता . माळी यांच्या शेताजवळ समोरून येणारा केए २८ - ५९६९ या क्रमांकाचा टिप्पर धडकल्याने तो गंभीर जखमी होऊन मरण पावला. अशी नोंद वळसंग पोलिसात झाली. याप्रकरणी पोलिसांनी टिप्परचा चालक सिध्दाराम भीमाशंकर कोळी (रा. माळीनगर) याच्याविरुध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला. हवालदार कुंवर पुढील तपास करीत आहेत.

पत्नीच्या तक्रारीनंतर

डिसले गुरुजी गेले शिक्षणासाठी अमेरिकेत वास्तव्यास

कुर्डूवाडी : ग्लोबल टीचर रणजितसिंह महादेव डिसले यांच्याविरोधात पत्नीने कौटुंबिक हिंसाचाराबाबत लातूर न्यायालयात तक्रार केली आहे. त्यानंतर ते पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. माढा तालुक्यातील परितेवाडी येथील चव्हाण वस्ती जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेले डिसले गुरुजी १ ऑगस्ट २०२४ ते ३१ मे २०२५ दरम्यान नऊ महिन्यांच्या असाधारण विनावेतन रजेवर असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

दरम्यान, डिसले गुरुजी हे १ ऑगस्टपासून नऊ महिन्यांच्या रजेवर गेले आहेत. ते अमेरिकेतील एका विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी जाणार असल्याचे त्यांच्याकडून रजेवर जाताना सांगण्यात आले. त्यांच्या पत्नीने तक्रार दाखल केल्याबाबत शिक्षण विभागाकडे माहिती नाही, असे माढ्याचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव यांनी सांगितले.

विहिरीत इसमाचा मृतदेह आढळला

कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथील भोरगुंडे यांच्या शेतातील विहिरीत एका ३० ते ३५ वयोगटातील अनोळखी इसमाचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळून आला. ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. वळसंगच्या पोलिसांनी विहीरीतून मृतदेह बाहेर काढला आणि तो उत्तरीय तपासणीसाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयाकडे पाठवून दिला आहे.

किसान रेल पुन्हा सुरु करण्याची खा. मोहिते-पाटलांची मागणी

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या वाहतुकीसाठी सुरु केलेल्या किसान रेल गेल्या अनेक महिन्यापासून बंद आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला ते बिहार राज्यातील दानापूर किसान रेल्वे पुन्हा सुरू करावी, अशी मागणी माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. सोलापूर जिल्ह्यात गतीशक्ती मल्टी-मॉडेल कार्गो टर्मिनल उभारावे या संदर्भातही वैष्णव यांच्याशी मोहिते पाटील यांनी चर्चा केली.

माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला ते बिहार राज्यातील दानापूर किसान रेल्वे पुन्हा सुरू करण्याच्या संदर्भात आग्रही मागणी केली. कोरोना काळात केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या

सोलापूर : माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी नवी दिल्लीत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली व कृषी रेलची मागणी केली.

मालवाहतुकीसाठी किसान रेल्वे सुरू केली होती. या योजनेला देशभरातील शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या रेल्वेचा वापर करून दिल्ली, कोलकाता, मुझफ्फरपूर, आणि शालिमारसारख्या मोठ्या शहरांमध्ये डाळींब, द्राक्ष, केळी, पेरू, कांदा, लिंबू, आणि इतर भाज्यांचे कमी खर्चात आणि कमी वेळेत वाहतूक केली होती. किसान रेल्वेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा मालवाहतुकीवरील खर्च ७५ टक्के कमी झाला होता. रस्ते वाहतुकीसाठी प्रति किलोमीटर ७-८ रुपये खर्च येत असे, तर रेल्वेच्या माध्यमातून मालवाहतूक केल्यास हा खर्च प्रति किलोमीटर केवळ २.५० रुपये इतका कमी झाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी किसान रेल्वे एक फायदेशीर पर्याय बनला होता. या पार्श्वभूमीवर, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्र सरकारकडे किसान रेल्वे पुन्हा सुरू करण्याची आणि सांगोला, पंढरपूर, कुर्डूवाडी , केम, आणि जेऊर या स्थानकांवर या रेल्वेचे थांबे देण्याची मागणी केली आहे. सोलापूर जिल्ह्यात गतीशक्ती मल्टी-मॉडेल कार्गो टर्मिनल उभारल्यास जिल्ह्याचा औद्योगिक विकास होईल, आणि रोजगार निर्मितीतही मोठी वाढ होईल. म्हणून, सोलापूर जिल्ह्यातील रेल्वे मार्गावर गतीशक्ती मल्टी-मॉडेल कार्गो टर्मिनल उभारण्याची आपण तातडीने कारवाई करावी अशी विनंती वैष्णव यांना केली आहे,असे मोहिते पाटील यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रात वाढ करण्यासाठी आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी तसेच येथील वस्त्रोद्योग, विविध कृषी उत्पादने, आणि औद्योगिक वस्त्या या ठिकाणांहून उपलब्ध होणाऱ्या मालाच्या वाहतुकीसाठी गतीशक्ती मल्टी-मॉडेल कार्गो टर्मिनल अत्यंत उपयुक्त ठरेल. या टर्मिनलमुळे, बियाणे, सिमेंट, स्टील, टाइल्स, कंटेनर, आणि इतर विविध वस्तूंची वाहतूक करता येईल. एक मालगाडी साधारणपणे ४०-५० डब्यांची असते आणि याची हाताळणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असते. या प्रक्रियेत मजूर, सुरक्षा रक्षक, क्रेन चालक, आणि कामगारांची आवश्यकता भासेल. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

वस्त्रोद्योग - कृषी उत्पादकांना चालना मिळणार

या व्यतिरिक्त, सोलापूरमधील वस्त्रोद्योगाला आणि कृषी उत्पादकांना या टर्मिनलमुळे जागतिक बाजारपेठांमध्ये स्पर्धा करण्याची संधी मिळेल. या भागातील उत्पादकांना त्यांच्या उत्पादनांची बाजारपेठेत जलद आणि प्रभावी वाहतूक करण्याचा मार्ग सुलभ होईल. ज्यामुळे निर्यातीला चालना मिळेल. तसेच, या धोरणामुळे औद्योगिक वसाहतींच्या जवळपासच्या भागात नवे आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, यासाठी मी प्रयत्नशील असल्याचे मोहिते पाटील म्हणाले.

तिसरा डोळा

- प्रकाश पोरे

इथे तुम्हाला बरेच सोलापूरकर भेटतील !

कल्याण
380-14-699